## रे.दि.मु.नं.१८७/२०२२ मधील नि.क्र.१४ व १५ वरील संयुक्तीक आदेश (घोषित दि.१६.०१.२०२४).

वादीने अर्ज नि.क्र.१४ हा दाव्यामध्ये दुरूस्ती करण्यासाठी तर अर्ज नि.क्र.१५ हा मनाई हुकूमाच्या अर्जामध्ये दुरूस्ती होवून मिळणेकामी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ अन्वये दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र. १ ते ४ यांचे म्हणणे मागविले असता त्यांनी त्यांचे म्हणणे नि.क्र.२२ वर दाखल करून वादीचा अर्ज खर्चासह नामंजूर करण्याची विनंती केलेली आहे.

२. वादीचे अर्ज त्यावर प्रतिवादींचे म्हणणे वाचले. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला आणि कागदपत्रांचे अवलोकन केले.

३. वादीने प्रस्तुतच्या अर्जात असे कथन केले आहे की, वादीने सदरचा दावा हा वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये जी समाईक भिंत आहे ती प्रतिवादीने उतरवून घेवू नये याकरिता निरंतर ताकिद मनाई हुकूमाची मागणी करणारा दावा दाखल केलेला आहे. सदर दावा दाखल करताना ग्रामपंचायत मिळकत क्रमांक ५५९ याचा उल्लेख करण्यात आलेला आहे. परंतु, दावा मिळकतीस ग्रामपंचायत मिळकत क्रमांक व सिटी सर्वे नंबर आहेत. वादी आणि प्रतिवादी यांच्यातील वादाचे निराकरण होणेसाठी मिळकतींचे दोन्ही नंबरचे उल्लेख दाव्यात करणे आवश्यक आहे. करिता, ग्रामपंचायत मिळकत क्रमांक ५५९ यास काट मारून ग्रामपंचायत मिळकत क्रमांक ३२७ तसेच सिटी सर्वे नंबर ५५९ दाव्यामध्ये व मनाई हुकूमाच्या अर्जामध्ये लिहीन्यास परवानगी देण्यात यावी. सदरची दुरूस्ती ही तांत्रीक स्वरूपाची आहे. यामुळे, दाव्याचा मुळ हेतू विफल होत नाही. तसेच, सदरचा दावा हा अद्यापपावेतो चौकशीकामी नेमण्यात आलेला नाही. करिता, दाव्यात व मनाई हुकूमाच्या

अर्जामध्ये वादीस वर उल्लेख केल्याप्रमाणे मिळकतीचे क्रमांक लिहीन्यास परवानगी देण्यात येवून वादीचा दुरूस्तीचा अर्ज मंजूर करण्यात यावा अशी विनंती वादीने केलेली आहे.

४. प्रतिवादी क्र. १ ते ४ यांनी नि.क्र.२२ वर आपले म्हणणे दाखल करून वादीचा सदरचा अर्ज खोटा व लबाडीचा असून तो रद्द करण्याची विनंती केली आहे. पुढे त्यांनी असेही कथन केलेले आहे की, केवळ प्रतिवादी यांना नाहक त्रास देण्यासाठी व कामकाज लांबविण्यासाठी वादीने सदरचा अर्ज दाखल केलेला आहे. दाव्यामधील चुक ही वादीच्या निष्काळजीपणामुळे झालेली आहे. त्यामुळे, वादीचा अर्ज हा कायद्याने विचारात घेतला जावू शकत नाही. तो खर्चासह रद्द करण्यात यावा अशी विनंती प्रतिवादी यांनी केलेली आहे.

५. वादीचा अर्ज आणि त्यावरील प्रतिवादीचे म्हणणे वाचले, दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला आणि कागदपत्रांचे अवलोकन केले. वादीने दावा दाखल करताना त्याच्या मिळकतीचा उल्लेख हा ग्रामपंचायत मिळकत क्रमांक ५५९ असा केलेला आहे. परंतु, दावा मिळकतीस सिटी सर्वे नंबर ५५९ असून ग्रामपंचायत मिळकत क्रमांक ३२७ आहे. सदरची दुरूस्ती ही केवळ हस्त दोषाची दिसून येत आहे. दावा हा प्राथमिक अवस्थेत आहे. मिळकतीचा योग्य तो उल्लेख दाव्याच्या अंतिम निकालासाठी आवश्यक आहे. सदरच्या दुरूस्त्या ह्या औपचारारिक अशा स्वरूपाच्या आहेत. दाव्यात वाद विषय निश्चित होवून तो पुराव्याकामी नेमण्यात आलेला नाही. सदरच्या दुरूस्त्या ह्या औपचारिक स्वरूपाच्या आहेत. त्यामुळे, वादीला दाव्याचा अंतिम निकाल गुण–दोषांवर होणेकरिता दुरूस्ती करण्यास परवानगी देण्याची आवश्यकता आहे. प्रतिवादींनी केलेल्या तक्रारी ह्या अत्यंत मोघम स्वरूपाच्या आहेत. त्या तक्रारी कायद्याने विचारात घेतल्या जावू शकत नाहीत. न्यायाचा समतोल साधण्याकरिता वादीचा अर्ज सशर्त मंजूर करणे आवश्यक आहे. म्हणून,

मी खालील आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

१. वादीचे नि.क्र.१४ व १५ वरील दोन्ही अर्ज रूपये ५००/–(पाचशे रूपये) एवढ्या खर्चाच्या रक्कमेसह मंजूर करण्यात येत आहे.

२. वादीने सदरची खर्चाची रक्कम प्रतिवादी क्र.१ ते ४ यांना एकत्रीत अदा करावी.

३. वादीने खर्चाची रक्कम १४ दिवसांच्या आत प्रतिवादींना अदा केल्यानंतर सदरची दावा दुरूस्ती करावी व दुरूस्त दाव्याची प्रत अभिलेखावर सादर करावी.

(एस. एस. निचळ)

दि.१६.०१.२०२४. — ३ रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,वाई.